Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 1 | July – 2015

प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांच्या सभासदांचा कृषीविषय आर्थिक अभ्यास

श्रीकांत एस. चौधरी[१] , अे.पी. सरोदे[२]

सारांश :

भारतासारख्या कृषीप्रधान देशामध्ये शेतीसाठी शेतकऱ्यांना कर्जपुरवठ्याची अत्यावश्यकता असते सहकारी संस्थामार्फत गावोगावी, खेड्यापाड्यात शेतकऱ्यांना कर्जपुरवठा व्हावा असा प्रयत्न करण्यात आला यासाठी सर□ार-ने □षी वित्त पुरवठ्याची त्रिस्तरीय यंत्रणा निर्माण करून गाव पातळीवरील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था हा तिसरा स्तर असून कृषी वित्त पुरवठ्यात या संस्थांचे अत्यंत मोलाचे योगदान आहे. प्रस्तुत शोध निबंधामध्ये उद्दीष्टे, गृहीतकृत्ये, नमुना निवड, माहिती संकलन, समस्या व उपाययोजनांचा समावेश आहे.

प्रमु□ शब्द-

प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था, सभासद, आर्थिक, वित्तपुरवठा, कर्ज

Short Profile

Shrikant S . Chowdhury is working as an Assistant Professor at Art, Commerce and Home Women's College in Jalgaon.

प्रास्ताविक :-

भारत हा कृषी प्रधान देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. रोजगार, व्यापार, उद्योग आदि बाबतीत कृषी व्यवसायाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचे प्रमु□ साधन म्हणून ही शेती व्यवसायाला महत्त्वाचे स्थान आहे. देशाच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे शेतीने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शेतीचे महत्त्व ओळखून कृषी व्यवसायातील विविध समस्या सोडविणे कृषी विकासामध्ये सरकारने नेहमीच प्राधान्य दिले आहे. कृषी व्यवसायापुढे ज्या अनेक समस्या आहेत त्यात कृषी वित्त पुरवठ्याची समस्या अत्यंत महत्त्वाची आहे. ती सोडविण्यासाठी सरकारने अनेक प्रयत्न केले. त्यात सहकारी वित्त पुरवठ्याचा विकास हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. शेतकऱ्यांना सहज आणि अल्प व्याजदराने तात्काळ स्थानिक पातळीवर कर्ज पुरवठा व्हावा यासाठी सर□ार-ने □षी वित्त पुरवठ्याची त्रिस्तरीय यंत्रणा निर्माण केली. यातील गाव पातळीवरील तिसरा स्तर म्हणजे प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था असून कृषी वित्त पुरवठ्यात या संस्थांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. प्रस्तुत शोध निबंधात रावेर तालुक्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांची प्रातिनिधीक निवड करून □षी वित्तपुरवठ्याचा अभ्यास केलेला आहे.

उद्दिष्टे

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यामागे पुढील उद्दिष्टे आहे.

१) प्राथमि□ □षी सह□ारी पतसंस्थांचा कृषी पतपुरवठ्यातील सहभाग अभ्यासणे.

२) प्राथमि□ □षी सह□ारी पतसंस्थाच्या सभासद लाभार्थींच्या अडीअडचणींचा अभ्यास करणे.

३) प्राथमि□ □षी सह□ारी वित्त पुरवठ्यातील अडीअडचणी सोडविण्यासाठी उपाय सुचविणे.

□हीतकृत्ये-

उपरोक्त विषयाचा अभ्यास □रण्यासाठी खालील गृहीतकृत्ये स्विकारण्यात आले.

१) □षी वित्त पुरवठ्यात प्राथमिक सहकारी पतसंस्थांचा वाटा महत्त्वपूर्ण आहे.

२) थकबाकीचे वाढते प्रमाण ही सहकारी वित्त पुरवठ्यातील प्रमुख समस्या आहे.

[१]सहाय्यक प्राध्यापक , कला, वाणिज्य व गृहविज्ञान महिला महाविद्यालय,जळगाव.

[२]सहयोगी प्राध्यापक , म.जे. महाविद्यालय,जळगाव

नमुना निवड-

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी नमुना निवड पद्धतीचा अभ्यास करण्यात आला. वेळ, पैसा, विषयाची व्याप्ती इ. चा विचार करता यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने कर्जदार सभासदांची नमुना निवड करण्यात आली.

जळगाव जिल्ह्यात एकूण १५ तालुके असून प्रातिनिधीक नमुन्यासाठी रावेर या तालुक्याची निवड करण्यात आली. या तालुक्यातील प्रातिनिधीक स्वरूपात निंभोरा, खिरोदा, चिनावल, वाघोदा, खिर्डी या पाच प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांच्या प्रत्येकी १० या प्रमाणे (१०x५) ५० सभासदांची अभ्यासासाठी निवड करण्यात आली. निवड केलेल्या सभासदांपैकी प्रश्नावली, मुलाखत व चर्चेद्वारा माहिती संकलीत केली. उपरोक्त माहितीचे विश्लेषण व विवेचन करण्यात येईल.

माहिती संकलन-

□ठल्याही विषयावर संशोधन करण्यासाठी संबंधित विषयाच्या संदर्भातील माहिती अत्यंत आवश्यक असते. उपरोक्त शोधनिबंध प्रामुख्याने प्राथमिक स्वरूपाच्या माहितीवर आधारलेला असून नमुना निवड केलेल्या सभासद आणि प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांकडून प्रश्नावली, मुलाखत व चर्चेद्वारे माहिती संकलीत करण्यात आली. संदर्भ म्हणून द्वितीय स्वरूपाच्या माहितीचा आधार घेतलेला असून त्यासाठी प्रस्तुत विषयाच्या संदर्भातील संदर्भ ग्रंथ, अहवाल व लिखीत साहित्याचा आधार घेतलेला आहे.

□र्जदार सभासदांचे शिक्षण-

व्यवसाय कोणताही असला तरी शिक्षणाला अत्यंत महत्त्व असते. अलीकडे कृषी व्यवसायामध्येही नवनवीन प्रयो□ होऊ लागल्याने शिक्षणाला महत्त्व प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागातही शेतकरी, शेतमजूर आपल्या मुलांना उच्च शिक्षण देण्यासाठी प्राधान्य देत आहे.

□र्जदार सभासदाचे शिक्षण

प्राथमि□	उपप्राथमि□	उपप्राथमि□	पदवीधर	पदव्युत्तर	□षीपदवी	एकू□
-	-	-	१४०	४०	२०	२००

संदर्भ - प्रत्यक्ष संकलित माहितीवरून



प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना नमुना निवड केलेल्या सभासदांमध्ये सर्व स्तरावरील शिक्षण घेतले आहे. सभासद किंवा त्यांच्या कुटुंबातील सदस्य आढळून आलेत. नमुना निवड केलेल्या ५० सभासदांमध्ये एकूण २०० सदस्य असल्याचे आढळून आले. यात सर्वच सहभागी प्राथमिक शिक्षण घेतलेले होते तर १४० सदस्य पदवीधर होते. ४० सदस्यांनी पदव्युत्तर शिक्षण घेतले तर २० सदस्यांनी कृषी पदवी प्राप्त केल्याचे आढळून आले.

थोडक्यात - कृषी व्यवसायामधे काम करणाऱ्यांमधे शिक्षणाचे प्रमाण वाढले असून शेती व्यवसायातील अनिश्चितता कर्जबाजारीपणा आहे. या कारणामुळे शेतकरी व शेतमजूर आपल्या मुलांना उच्चशिक्षण देऊन इतर व्यवसायांकढे वळू पाहतात किंवा आधुनिक पद्धतीने शेती करून शेतीमधे नवीन क्रांती घडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे असे म्हणता येईल.

शेतीचा प्रकार-

शेती प्रामुख्याने बागायती आणि कोरडवाहू या दोन प्रकारची असते. भारतात कोरडवाहू शेतीचे प्रमाण ७०% आहे. त्यामुळे भारतीय शेतकरी प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून असतो म्हणून शेतीला निसर्गाचा जुगार ही म्हणतात.

शेतीचा प्रकार

बागायती शेती	□ोरडवाहू शेती	एकूण शेती
३० एकर	५० एकर	८० एकर

संदर्भ- प्रत्यक्ष संकलित माहितीवरून



वरील तक्त्यात प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी निवड केलेल्या शेतकरी सभासदांपैकी एकूण ८० एकर शेती असल्याचे आढळून आले. यामधे ३० एकर शेती बागायती होते. याचा अर्थ राष्ट्रीय पातळीपेक्षा या तालुक्यात बागायती क्षेत्राचे प्रमाणे जास्त आहे असे म्हणता येईल. रावेर तालुक्यात हतनुर धरण असल्यामुळे कृषी सिंचनाचे प्रमाण अधिक असल्याने बागायती क्षेत्राचे प्रमाण तुलनेने जास्त दिसते. उर्वरित क्षेत्र कोरडवाहू असून (म्हणजे ५० एकर क्षेत्र) त्यामध्ये रब्बी पिके शेतकरी घेत असल्याचे आढळून आले.

नमुना शेतकरी कुटुंबाचे जमिन धारणेनुसार व□□र□

अ.नं.	शेतीचा आकार	सभासद सं□या	प्रमा□
१	२.५ एकर पर्यंत	३०	६०
२	२.५ एकर ते ५ एकर	१२	२४
३	५ एकरपेक्षा अधिक	८	१६
	एकूण	**५०**	**१००**

संदर्भ- प्रत्यक्ष संकलीत माहितीवरून



वरील तक्त्यात या नमुना ५० शेतकऱ्यांमध्ये २.५ एकरपेक्षा कमी क्षेत्र असणाऱ्या अल्प भूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक होते. एकूण ५० शेतकऱ्यांमध्ये ३० सभासदांकडे २.५एकर किंवा त्यापेक्षा कमी जमीन होती तर १२ सभासदांकडे २.५ ते ५ एकर च्या दरम्यान शेती असल्याचे आढळून आले. ५ एकरपेक्षा अधिक जमिन असणारे केवळ ८ म्हणजे १६% शेतकरी होते. थोडक्यात बहुतांश शेतकऱ्यांकडे कमी शेती असते म्हणजे अल्पभूधार□ शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त असते. एवढ्या कमी शेतीतून त्यांच्या कुटुंबाच्या गरजा भागत नाहीत. त्यांना उत्पन्नाची इतर साधने शोधणे गरजेचे असते. अत्यल्प उत्पन्नामुळे शेतीत अपेक्षित गुंतवणुक करता येत नाही. बँ□ा □िवा वित्तीय संस्थांकडील कर्जावर अवलंबून राहावे लागते असे म्हणता येईल.

नमुना निवड केलेल्या रावेर तालुक्यात बागायती शेतीचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे त्याचा परिणाम पीक पद्धतीवर झालेला दिसून येतो. केळी हे या तालुक्यातील प्रमुख रोखीचे पीक असून उस, कापूस, मका, आल, गहू, ज्वारी, सुर्यफूल इ. पिकेही घेतली जातात. नमुनाधारक सभासदांपैकी ३५ सभासदांनी केळीचे पीक घेतल्याचे आढळून आले तर उर्वरीत सभासदांमध्ये उसाची लागवड करणाऱ्यांचे प्रमाण अधिक होते.

थोडक्यात रावेर तालुक्यात केळी हे प्रमुख पिक असून रोखीचे जास्त उत्पन्न देणारे पीक म्हणून या पीकाचे लागवड करण्याकडे शेतकऱ्यांचा कल असतो. मधुकर सहकारी साखर कारखाना जवळ असल्यामुळे त्याचा परिणाम म्हणून उसाची लागवड करण्यालाही शेतकरी प्राधान्य देतात असे दिसून येते.

उत्पादन खर्च-

□ोणत्याही प्रकारच्या उत्पादनात उत्पादन खर्चाला महत्त्वाचे स्थान आहे. कृषी क्षेत्रात उत्पादन खर्चाबाबत अनिश्चितता असते. उद्योग क्षेत्राप्रमाणे उत्पादन खर्च निश्चित नसतो. नैसर्गिक परिस्थितीचा आणि अनिश्चिततेचा कृषी खर्चावर परिणाम होतो. शेतकऱ्यांकडे कृषी खर्चाबाबत निश्चित लिखीत आकडेवारी नसते.

एकरी सरासरी वार्षीक कृषी उत्पादन खर्च

अ.नं.	शेतीचा प्र□ार	रुपये	पि□ि□िहाय	
			□ळी व ऊस रुपये	□ापूस व म□ा रुपये
१	बागायती	१५०००	१५०००	०
२	□ोरडवाहू	८०००	०	८०००

संदर्भ- प्रत्यक्ष संकलित माहितीवरुन



वरील तक्त्यात ढोबळ आकडेवारीच्या आधारे शेतकरी उत्पादन खर्चाविषयी माहिती देतांना आढळून आले. नमुनाधारक शेतकऱ्याचा सरासरी वार्षीक एकरी उत्पादन खर्च बागायती शेतीसाठी रु. १५०००/- एवढा तर कोरडवाहू शेतीसाठी रु.८०००/- इतका खर्च येत असल्याचे संकलित माहितीवरून दिसून आले. या तालुक्यात केळी, उस यासारखी पिके घेत जात असल्याने तुलनेने येणारा उत्पादन खर्च ही अधिक असतो असे म्हणता येईल.

उत्पन्न-

उत्पादन खर्चाप्रमाणेच शेतीतील उत्पन्न ही अनिश्चित असल्याचे प्रस्तुत अभ्यासावरून दिसून आले. वारंवार येणाऱ्या नैसर्गीक आपत्तीचा परिणाम या तालुक्यातील कृषी उत्पन्नावर होत असल्याचे सभासदांच्या मुलाखतीवरून दिसून आले. नैसर्गीक आपत्तीबरोबरच कृषी मालाच्या दरातील अस्थिरता व अनिश्चिततेचा
परि ाम ही ृषी उत्पन्नावर होतो. ह्या उत्पादनाप्रमाणे कृषी उत्पादनाचे दर उत्पादन खर्चावर ठरत नाही. आधारभूत किमती ठरविता येत नाही. वास्तव उत्पादन खर्चाचा विचार होत नाही असे शेतकरी नमूद करतात. अशा सर्व परिस्थितीमुळे शेतीत अपेक्षित उत्पन्न येत नाही.

शेतीतील सरासरी एकरी उत्पन्न

अ.नं.	शेतीचा प्रकार	रुपये
१	बागायती	२८०००
२	ारडवाहू	१४०००

संदर्भ- प्रत्यक्ष संकलीत माहितीवरुन



वरील तक्त्यात नमुना शेतकऱ्यांकडे बागायती शेतीतील सरासरी एकरी उत्पन्न रू.२८०००/- तर कोरडवाहू शेतीतील सरासरी एकरी उत्पन्न रु.१४०००/- असल्याचे दिसून आले.

ृषी कर्ज-

शेतीत अत्यल्प उत्पन्न येत असल्यामुळे शेतकऱ्यांना ृषी ार्जावर अवलंबून राहावे लागते. शेतकरी प्रामुख्याने अल्पमुदती पीक कर्ज व शेतात दीर्घकालीन गुंतवणूक करण्यासाठी दीर्घ मुदती कर्ज घेत असतात. शेतकऱ्यांना कृषी, मशागत, बियाणे, खते यांची खरेदी रण्यासाठी पीक कर्जाची तर विहीर खोदकाम, बोअरवेल, शेतीतील सुधारणा, ट्रॅक्टर, ट्रिलर, कृषी सिंचन, कृषी अवजारे खरेदी करण्यासाठी दीर्घ मुदती ार्जाची गरज असते असे कर्ज प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था तसेच राष्ट्रीयीकृत बँका व प्रसंगी सावकारांकडूनही घेत असल्याचे आढळून आले. कृषी वित्त पुरवठ्यात प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे दिसून आले. निवड केलेल्या सर्व सभासदांनी प्राथमि ृषी सह ारी पतसंस्थांकडून अल्प मुदती पिक कर्ज घेतले होते तर याच संस्थांमार्फत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून ट्रॅक्टर व अन्य कारणासाठी दीर्घमुदती कृषी कर्ज घेतल्याचे दिसून आले. नमुना निवड केलेल्या सभासदांनी घेतलेल्या कर्जात सर्व १०० टक्के सभासदांनी सहकारी वित्त पुरवठ्यामार्फत म्हणजे प्राथमिक कृी सहकारी पतसंस्थेमार्फत कर्ज घेतल्याचे दिसून आले. शेतकऱ्याला स्थानिक पातळीवर वेळेवर तात्काळ कर्ज उपलब्ध होत असल्याने या सहकारी वित्त पुरवठ्यात ते प्राधान्य देतात. सरकारी धोरणात वेळोवेळी सरकारने घेतलेल्या धोरणाचा लाभही शेतकऱ्यांना होतो. कमी व्याजदर, कोणतेही तारण न ठेवता सभासदांना आपल्या धारण क्षेत्राच्या आधारावर ठराविक प्रमाणात असे कर्ज उपलब्ध होते.

सरासरी कृषी कर्ज आणि थकबाकी

प्र□ार	एकूण रुपये	सरासरी □र्च रुपये	-नमु-ा शेतकरी सं□या
□षी कर्ज	१२.५००००	२५.०००	५०
थ□बा□ी	७.५००००	१५.०००	५०

संदर्भ- प्रत्यक्ष संकलीत माहितीच्या आधारे



वरील तक्त्यात नमुना ५० शेतकऱ्यांकडे सरासरी रु.२५०००/- चालु वार्षीक कर्ज तर सरासरी रु.१५,०००/- थकबाकी असल्याचे आढळून आले. काही सधन किंवा मोठ्या शेतकऱ्यांकडे कर्जाचे प्रमाण अधिक असून ते शेतकरी नियमित कर्जफेड करू शकत असल्यामुळे अशा शेतकऱ्यांकडील थकबाकीचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून आले.

□षी कर्जाचा वापर हा शेतीसाठीच होतो किंवा नाही हा ही महत्त्वाचा मुद्दा आहे. अनेक शेतकरी कृषी □र्जाचा वापर ज्या कारणासाठी कर्ज घेतले आहे त्यासाठीच करतात का असा प्रश्न केल्यास जवळपास सर्वच शेतकरी होकारार्थी उत्तर देतात मात्र प्रत्यक्षात अनेक शेतकरी अशा कर्जातच आपले इतर कौटुंबिक खर्चही करताना दिसून येतात. कृषी कर्जाचा वापर त्याच कामासाठी केला जातो किंवा नाही हे पाहण्याची निश्चित यंत्रणा पतपुरवठा करणाऱ्या संस्थांकडे नसल्याचे अभ्यासावरून दिसून आले. त्यामुळे कृषी कर्जाचा यो□ा वापर होतोच असे नाही.

थोडक्यात प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था हा कृषी वित्त पुरवठ्याचा प्रमुख आधारस्तंभ आहे. कृषी विकासात आणि शेती कर्ज पुरवठ्यात या संस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असे म्हणता येईल.

समस्या व उपाययोजना-

प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाच्या सभासदांचा कृषी विषयक अभ्यास करताना समस्या आढळल्या आणि त्या समसया दूर करण्यासाठी उपाययोजनांची माहिती पुढील प्रमा□-

१) □षी वित्तपुरवठा-

□ामीण भागात प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था ग्रामीण कृषी कर्ज पुरवठा करण्यात अत्यंत महत्वाच्या ठरत असल्या तरी या कृषी पतपुरवठ्यावर अनेक मर्यादा येतात. उदा. या पतसंस्थांकडे स्वत:चे भांडवले नसते. त्या जिल्हा बँकेकडून आलेल्या निधीवर अवलंबून असतात. तसेच सरकारी धोरणाच्या मर्यादेत त्यांना कृषी पुरवठा करावा लागतो म्हणजे वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात त्या □र्जपुरवठा करू शकत नाही म्हणजे कृषी कर्जाची पूर्ण गरज भागवण्यास त्या असमर्थ ठरतात. अशा पतसंस्थांनी स्वत:च्या भांडवलामध्ये वाढ केली पाहिजे. स्थानिक गावातील लोकांकडून ठेवी स्विकारून त्या आपल्या भांडवलात वाढ करू शकतात.

२) □षी शि□□ण -

□षी शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. शेतीतील अनिश्चिततेमूळे, कमी उत्पन्नामुळे तसेच कृषी व्यवसाय प्रतिष्ठेचा समजला जात नसल्यामुळे शेतकऱ्याचे मुले शि□ुन शेती करण्यापेक्षा इतर व्यवसाय किंवा नोकरी करण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे या शिक्षणाचा कृषी विकासाला अपेक्षेप्रमाणे हातभार लागत नाही. म्हणून शिक्षणाचा कृषी व्यवसायाला लाभ व्हावा यासाठी कृषी व्यवसाय प्रतिष्ठेचा मानला जावा, कृषी व्यवसायात उत्पन्न वाढेल, निश्चितता येईल यादृष्टीने कृषी विषय□ धोरण करण्यात यावे.

३) शेतीचा प्रकार-

□ोरडवाहू भारतीय शेतीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. बहुतांश शेती निसर्गाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने बाराही महिने शेती करता येत नाही. अतिवृष्टी किंवा दुष्काळामुळे अनेकदा मोठ्या प्रमाणावर कृषी मालाचे नुकसान होते. थोडक्यात शेतीच्या या वैशिष्ट्यामुळे कमी उत्पन्नावर विपरीत परिणाम होतो म्हणून जास्तीतजास्त क्षेत्र सिंचनाखाली येईल. या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्यासाठी धरणे, कालवे, शेततळे, छोटे बंधारे या सारखे उपक्रम राबवून पावसाचे पाणी जास्तीत जास्त अडवण्याची व्यवस्था करता येऊ शकेल.

४) उत्पादन खर्चाची अनिश्चितता-

अनिश्चित उत्पादन खर्च ही कृषी व्यवसायातील एक समस्या आहे. शेती व्यवसायात उत्पादनाचा खर्च निश्चित नसतो. निसर्गाच्या लहरीवरच हा खर्च अवलंबून असतो. कृषी उत्पादनाच्या किमती ठरवताना अशा उत्पादन खर्चाचा विचार होत नाही. त्यामुळे उत्पन्न व खर्च याचा मेळ बसत नाही. □धीकधी तर केलेला खर्च ही भरून निघत -नाही. म्ह□-न शेतमालाच्या किमती ठरविताना उत्पादन खर्चाचा विचार होणे आवश्यक आहे. तसे झाल्यास उत्पादनाचा खर्च निघून किमान नफा मिळविणे शक्य होईल.

५) थ□बा□ी-

उत्पन्नाच्या अनिश्चिततेमुळे कृषी कर्जाची वेळेवर परतफेड करणे शक्य होत नाही. परिणामी उत्पन्नाच्या अनिश्चिततेमुळे कृषी कर्जाची वेळेवर परतफेड करणे शक्य होत नाही. परिणामी कर्जाची थकबाकी वाढत जाते. कालांतराने असा थकबाकीदार शेतकरी कर्जबाजारी होतो. कर्जबाजारीपणामुळे आत्महत्येसही प्रवृत्त होतो. कृषी कर्जाची थ□बाकी वाढू नये म्हणून वेळेवर अशा □र्जाची वसुली □रण्याचे धोरण सरकारने व पतसंस्थांनी आखणे गरजेचे आहे.

समारोप-

थोडक्यात प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था या चांगल्या उद्देशाने अस्तित्वात आल्या मात्र त्यात आलेल्या अपप्रवृत्तीनी सहकार क्षेत्रातील या संस्थांची अवस्था कठीण केली. या संस्थांना थकबाकीचे प्रमाण कमी करण्यात यश आले असले तरी कर्ज वसुली करणे पूर्णपणे शक्य झाले -नाही. बऱ्याच वेळेला कर्जाचे नुतनीकरण केले जात असल्यामुळे प्रमाण पूर्णपणे कमी झ ालेले -नाही.

संदर्भ-

१) संशोधन पद्धती - डॉ. वा. भा. पाटील.

२) □द्रिय सह□ारी बँ□द्वारा □षी वि□ास - डॉ. हरीदास पाटील.

३) योजना मासि□ - एप्रिल-२००९, जानेवारी-२०११.

४) सहकारी मुलतत्वे- प्रा. प्र. रा. □ल□□ी, विद्या बु□ पब्लिशर्स, औरंगाबाद, जुन-१९९९.

५) सहकारी मुलतत्वे - प्रा. व्ही. टी. चौगुले, प्रा. के. जे. पठाण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पु□, २००७.

६) सहकाराचा विकास - एस. के. कुलकर्णी, फडके प्र□ाशन, □ोल्हापूर झ २००९.

७) दि जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगाव- अहवाल.

श्रीकांत एस. चौधरी

सहाय्यक प्राध्यापक , कला, वाणिज्य व □हविज्ञान महिला महाविद्यालय,जळगाव.